महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४० वा | दिनांक : २४/११/२०२५ | वार : सोमवार


## २०४७ पर्यंत काँग्रेसला सत्ता नाही - चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई** : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा माहोल चांगलाच तापला असून सर्वच पक्षांनी जोरदार प्रचारयात्रा, सभा आणि शक्तीप्रदर्शनाला वेग दिला आहे. अशातच आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वाशिममध्ये काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. निवडणूक प्रचारासाठी मालेगाव शहरात आलेल्या बावनकुळे यांनी काँग्रेसचे नेतृत्व, अंतर्गत भांडणं आणि विकासाच्या अजेंड्यावर प्रश्न उपस्थित करत महाविकास आघाडीवरही टीकेची झोड उठवली.

आपल्या भाषणात बावनकुळे यांनी असा दावा केला की, २०४७ पर्यंतही काँग्रेसला केंद्रात किंवा राज्यात सत्ता मिळणार नाही. कारण काँग्रेसकडे विकासाबाबत स्पष्ट योजना नाही आणि जनतेकडून मिळणारा प्रतिसादही खूप कमी होत आहे. महाराष्ट्रातील जनतेने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप-महायुतीला मिळवून दिलेला पाठिंबा याचे स्पष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार महायुतीला ३ कोटी १८ लाख मतं मिळाली तर महाविकास आघाडीला २ कोटी १८ लाख मतांवर समाधान मानावे लागले. पुढील २०२९ मध्येही महायुतीच सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी काँग्रेसमधील अंतर्गत भांडणांवरही त्यांनी जोरदार टीका केली. काँग्रेसमध्ये कुणाचा पाय कुणाच्या पायात बसत नाही, अशी टीका करत त्यांनी अनेक नेत्यांची उदाहरणे दिली. विजय वडेट्टीवार, नाना पटोले, सुनील केदार, यशोमती ठाकूर आणि हर्षवर्धन सपकाळ या नेत्यांमध्ये परस्पर संवाद कमी असून निर्णयप्रक्रियेत समन्वयाचा पूर्ण अभाव आहे, असे ते म्हणाले. या विसंवादामुळेच काँग्रेस कमजोर होत चालली आहे आणि भविष्यात ही पार्टी किंचित पार्टी म्हणूनच ओळखली जाईल, असा दावा त्यांनी केला.

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या एका काँग्रेस कार्यकर्त्याचा उल्लेख करत बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसमध्ये रोज भांडणं, गटबाजी आणि फूट दिसते. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होऊन पक्ष सोडत आहेत. तर दुसरीकडे महायुती सरकार राज्याच्या विकासासाठी सातत्याने काम करत आहे. विकासकामांच्या जोरावर लोकांचा विश्वास भाजपवर वाढत असून येत्या काळात हा विश्वास अजून दृढ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. भाजप महायुती सरकार आगामी काळात अनेक मोठी प्रकल्प, उद्योग आणि सुविधा राज्यात आणणार आहे. त्यामुळे २०२९ पर्यंत काँग्रेसचं अस्तित्व आणखी लहान होईल, असेही ते म्हणाले.

बवानकुळे यांच्या या वक्तव्यामुळे निवडणूक वातावरणात नवी चर्चा रंगू लागली आहे. काँग्रेसवर केलेल्या टीकेमुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय तणाव अजून वाढण्याची शक्यता असून आगामी काही दिवसांमध्ये वातावरण आणखी तापेल यात शंका नाही. बवानकुळे यांनी केलेल्या विधानांची पुढील राजकीय प्रतिक्रिया काय येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गौरी गर्जे मृत्यू प्रकरणात मंत्री पंकजा मुंडेंची पहिली प्रतिक्रिया



**मुंबई** : मुंबईतील वरळी परिसरात घडलेल्या डॉ. गौरी पालवे गर्जे यांच्या संशयास्पद मृत्यूने राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नीने आत्महत्या केल्याची माहिती समोर आल्यानंतर या प्रकरणात अनेक गंभीर आरोप कुटुंबीयांकडून करण्यात आले आहेत. यामुळे प्रकरण अधिकच चिघळले असून पोलिस तपासावरही सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर स्वत: पंकजा मुंडे यांनी निवेदन जारी करत या घटनेबाबत दुःख व्यक्त केले असून, कोणतीही कसूर न करता सखोल तपास व्हावा अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

मुंडे म्हणाल्या की, घटनादिवशी संध्याकाळी त्यांचे पीए अनंत गर्जे अत्यंत आक्रोशाने फोनवर बोलले आणि पत्नीने आत्महत्या केल्याची माहिती दिली. हा धक्का स्वत:लाही बसल्याचे त्या म्हणाल्या. गौरी गर्जे यांच्या वडिलांनी मुलीची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केल्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. त्यामुळे सत्य बाहेर येण्यासाठी पोलिसांनी प्रत्येक कोनातून तपास करावा, असे आवाहन करताना ही घटना मन सुन्न करणारी आणि अतिशय वेदनादायक असल्याचे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

मुंबईच्या वरळी परिसरात राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉ. गौरी पालवे गर्जे यांच्या मृत्यूने राज्यभरात खळबळ उडाली आहे. शनिवारी संध्याकाळी गौरी यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली होती. मात्र गौरी यांच्या कुटुंबीयांनी हा मृत्यू आत्महत्या नसून संशयास्पद असल्याचा आरोप केल्यानंतर या प्रकरणाला नवं वळण मिळाले आहे. कुटुंबीयांच्या तक्रारीनंतर वरळी पोलिसांनी अनंत गर्जे, त्यांची बहीण शीतल गर्जे आणि भाऊ अजय गर्जे यांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही संपूर्ण घटना राजकीय स्तरावरही चांगलीच गाजत असून या मृत्यूमागील सत्य काय, याबद्दल विविध चर्चांना उधाण आले आहे.

घटनेनंतर पोलिसांनी गौरी पालवे गर्जे यांचा मृतदेह ताब्यात घेऊन केईएम रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. मात्र त्यावेळी कोणताही गुन्हा नोंद झाला नव्हता. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या गौरी यांच्या नातेवाईकांनी शनिवारी रात्रीपासूनच वरळी पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसून कडक कारवाईची मागणी केली. कुटुंबीयांचा आरोप असा की, गौरीची वाढती मानसिक घालमेल, तणाव आणि विवाहित जीवनातील समस्या यांमुळे त्या त्रस्त होत्या. त्यांच्या मते, ही साधी आत्महत्या नाही तर संशयास्पद मृत्यू असून यामागे घरातील छळ आणि वादांचे धागेदोरे आहेत. अखेर रविवारी सकाळी पोलिसांनी अनंत गर्जे व त्यांच्या कुटुंबीयांवर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला.

## मालकासारखे बोलू नका ; नाना पटोलेंची टीका:अजित पवारांच्या वक्तव्यावर आक्रमक ; म्हणाले - तिजोरी तुमची नाही, जनतेची

**मुंबई** : नळदुर्ग नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. प्रचार सभेत बोलताना अजित पवार यांनी, राज्याची तिजोरी माझ्या हातात आहे, घड्याळाच्या पाठीशी उभं राहिलात तर बारामती सारखा विकास तुमच्याकडे करील, असे विधान केले होते. या विधानाने विरोधकांनी सरकारवर थेट पक्ष निष्ठेच्या आधारे विकासाचे आश्वासन देत असल्याचा आरोप केला आहे. अजित पवारांच्या वक्तव्याची चर्चा संपूर्ण राज्यात होत असतानाच, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या वक्तव्यावर कडक शब्दांत टीका केली.

नाना पटोले म्हणाले की, राज्याची तिजोरी एखाद्या व्यक्तीची संपत्ती नसून संपूर्ण जनतेचा निधी आहे. संविधानाने कोणत्याही मंत्र्याला तिजोरी लुटण्याचा किंवा तिजोरीचा वापर पक्षीय स्वार्थासाठी करण्याचा अधिकार दिलेला नाही. विकासाच्या नावाने मतं मागण्याऐवजी सत्ता आणि पैशांची भाषा करणं म्हणजे जनतेचा अपमान असल्याचे पटोले म्हणाले. ते पुढे म्हणाले की, एकीकडे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री स्वत:च्या अधिकारांची मिरवणूक करत फिरतात आणि दुसरीकडे सत्ताधारी पक्ष आपली ताकद दाखवत जनतेसमोर गर्विष्ठपणे बोलतो. महाराष्ट्राच्या तिजोरीचे तुकडे करून टाकले आहेत का? अशीच भाषा या लोकांकडून ऐकायला येते, असा कडवा सवाल पटोले यांनी उपस्थित केला.

काँग्रेस नेते पुढे म्हणाले की, लोकांनी निवडून दिल्याचा अर्थ नेता मालक झाला असा होत नाही. सत्तेत बसलेले लोक हे पाच वर्षांसाठी जनतेचे सेवक आहेत, हे समजून घेणे आवश्यक आहे. पटोले यांचा आरोप असा की, सत्तेचा माज आणि गर्व इतका वाढला आहे की सत्ताधारी जनता सर्व सहन करेल, हे त्यांना गृहित धरलं आहे. जनता तुम्हाला सत्तेत बसवते, तशीच ती तुम्हाला खालीही खेचू शकते. मालकाची भाषा आणि धमकीची भाषा लोकशाहीत चालत नाही. जनता हा गर्व चूर करून टाकेल, असा थेट इशारा पटोले यांनी अजित पवारांसह सत्ताधाऱ्यांना दिला.

दरम्यान, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या वक्तव्यावरूनही पटोले यांनी भाजपवर निशाणा साधला. बावनकुळे यांनी, मी भाजपचा स्टार प्रचारक आहे, कितीही खर्च होऊ द्या, निवडणूक आयोगाला उत्तर देऊ, असे वक्तव्य केले होते. या वक्तव्याने भाजपच्या नेत्यांना सत्ता आणि पैशांचा माज चढल्याचे पटोले यांनी म्हटले. त्यांच्या मते, सत्तेच्या जोरावर पैसा जमा करून निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न हा लोकशाहीसाठी धोकादायक आहे. भाजपला सत्ता मिळाल्यावर एक प्रकारची सर्वशक्तिमानता वाटायला लागली आहे. मात्र नगरपालिका निवडणुकीत जनता त्यांचा हा माज उतरवेल, असा दावा पटोले यांनी केला.

नळदुर्ग निवडणूक प्रचारात सुरू असलेली ही शब्दयुद्धे आता राज्यातील मोठ्या राजकीय चर्चेचे केंद्र ठरली आहेत. अजित पवारांच्या विधानापासून सुरू झालेला वाद काँग्रेस-भाजप-एनसीपी यांच्यातील तिखट आरोपांपर्यंत पोहोचला आहे. विकास, सत्ता, पैशांचा वापर आणि राजकीय गर्व या सर्व मुद्द्यांवरून सत्ताधारी व विरोधकांत संघर्ष वाढला आहे. आगामी नगरपालिका आणि स्थानिक निवडणुकांमध्ये मतदार या चर्चांना कसा प्रतिसाद देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ नोव्हेंबर २०२५

# नामस्मरणाने दुमदुमले अचलबेट : अभंग संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील श्री क्षेत्र अचलबेट या पवित्र ठिकाणी ऐतिहासिक असे भव्य दिव्य साहित्य संमेलन अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. अपेक्षेपेक्षा अतिशय उत्स्फुर्त असा प्रतिसाद या संमेलनास मिळाला. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून पांडुरंगाचे अभंग घेऊन आलेल्या तमाम कवी,रसिकांचे संयोजकांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले.श्रीक्षेत्र अचलबेट पांडुरंगाच्या पवित्र नाम स्मरणाने दुमदुमून गेले होते,सर्व परिक्षेत्र पांडुरंगमय झाले.संमेलनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच सुरुवातीला सर्व प्रमुख पाहुण्यांनी उज्वलानंद महाराज यांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले.माहिती जाणून घेतली. उज्वलानंद महाराज यांनी या अचलबेट श्री क्षेत्राला एक उत्कृष्ट असा पवित्रतेचा दर्जा दिला.भक्तिमय असा सोज्वळ आकार दिला.नावारूपाला आणले. ज्यावेळी उज्वलानंद महाराज इथे आले त्यावेळी इथे फक्त डोंगर ,झाडी आणि माळ होते.या परिसराचे नंदनवन करण्याचे सर्व श्रेय उज्वलानंद महाराज यांनाच जाते.अपूर्व नियोजन व परिश्रमपूर्वक संकल्पनांची अंमलबजावणी करून महाराजांनी उपासनेचा एक विलोभनीय दर्जा प्राप्त करून दिला.श्री क्षेत्र अचलबेट याच्या संपूर्ण परिसराची आस्थेवाईकपणे पाहणी केल्या नंतर मा. विश्वनाथ अण्णा तोडकर ,ह. भ.प.हरी लवटे गुरुजी, ह.भ.प.भीम महाराज, रमाकांतबापू कुलकर्णी , मा.श्री.व्यंकट अनिगुंठे, मा.सौ.विद्याताई वाघ,अनितातार्इ तोडकर,यांच्या हस्ते कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरेख असे सूत्रसंचालन महाराष्ट्रातील प्रसिद्ध संचालनकर्ते मा. भैरवनाथ कानडे यांनी केले. अधून मधून संलग्न कवितांचे वेचे म्हणत आधुनिक संत आणि प्रेक्षक, श्रोत्यांना झुलत ठेवले. नांदेड, संभाजीनगर, अहिल्यानगर, सोलापूर, पुणे अशा सर्वदूर परिसरातून अभंग कार सकाळी दहा वाजताच अक्षलबेटावर पोहचले होते. "संपविल्या रूढी,परंपरा नीच,परिवर्तन तूच ,पांडुरंग.." अशा पांडुरंगावर अनेक रचना सादर झाल्या .तर "आता मात्र दंग/लोकशाही तंग/विनोदाचे अंग/माणूसही पंग/व्यवस्थेत//" अशा सामाजिक आशयाचे अभंगही भरपूर प्रमाणात सादर झाले.कार्यक्रमात औपचारिक स्वागताचा कार्यक्रम झाल्यानंतर पहिल्यांदाच आलेल्या निमंत्रितासहित सर्व ,कवी,विचारवंत,कार्यकर्ते व श्रोत्यांना पोटभर जेवण देण्यात आले,आणि मग प्रत्यक्ष अभंग वाचनाला सुरुवात झाली.सामाजिक,वैचारिक,भक्ति मय ,आणि पांडुरंगाचे असंख्य अभंगाचा अक्षरशः पाऊस पडला.अत्यंत उत्स्फूर्त अशी सरस रचना पहावयास मिळाल्या.कांहीं कवींनी अतिशय पाल्हाळीक रचना करत श्रोत्यांना निरस करण्याचा प्रयत्न जरूर केला.पण त्यात जान भरली ती संचालन करणारे भैरवनाथ कानडे यांनी.श्रोत्यांचा मूड लक्षात घेऊन त्यांनी संमेलन आपल्या काव्याने एक नव्या उंचीवर नेऊन ठेवले.शेवटी संयोजन समितीला मधेच हस्तक्षेप करून प्रत्येकाचा वेळ कमी करून एकच अभंग सादर करण्याची विनंती करावी लागली.खरे तर साहित्यिक,कवी ,विचारवंत यांचे साहित्य समाजाला संस्कृतीची , सभ्यतेचे शिकवण देतात. अशा प्रकारची आगळी वेगळी साहित्य संमेलने वारंवार आयोजित करणे आवश्यक असल्याचे मनोगत अनेक पाहुणे आणि निमंत्रितानी व्यक्त केले.संमेलनातील सर्व कार्यक्रम यशस्वी आणि नेटके करण्यासाठी सर्वश्री भूमिपुत्र वाघ, अनिता तांबे, कमलाकर भोसले, विकास गायकवाड, लक्ष्मण पवार, सुधाकर झिंगाडे, दिनेश्वर माशाळकर व इतर अनेकांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे रीतसर आभार काव्यप्रेमी विकास राठोड यांनी मानले. शेवटी उपस्थित सर्वांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

## मुरूम नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीचा भाजपातर्फे प्रचार शुभारंभ



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरूम नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर मुरूम शहरातील भारतीय जनता पार्टी तर्फे दि. २३ रोजी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापूराव माधवराव पाटील, भाजप युवानेते शरण बसवराज पाटील, नगरसेवक, नगरसेविका पदाचे उमेदवार यांच्या शुभहस्ते शहरातील विविध मंदिर, धार्मिक स्थळी नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.प्रारंभी चैतन्यमूर्ती स्व. माधवराव पाटील काका यांच्या समाधीस्थळी बापूराव पाटील, शरण पाटील यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून श्री हनुमान चौकातील मुरूम शहर ग्रामदैवत श्री हनुमान, श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरात श्रीफळ फोडून अशोक चौक, टिळक चौक मार्गे सय्यदा गल्लीतील सातू सय्यद मुळ स्थळी पूजन करण्यात आले, शहरातील नारळ मठात लिं.शंभूलिंग शिवाचार्य महास्वामी यांना वंदन करून मठादीपती जय मल्लिकार्जुन महास्वामी यांचे आशीर्वाद घेऊन प्रभाग क्रमांक १ मधील उमेदवार समवेत युवानेते शरण पाटील यांच्या उपस्थितीत प्रचाराचा शुभारंभाला प्रारंभ झाला.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

### हिवाळा आला म्हणून

हिवाळा आला म्हणून
माकडाने घातली टोपी
झाडावर बसून
पिऊ लागला कॉफी

हिवाळा आला म्हणून
सशाने पांघरली शाल
थंडीत कुडकुडत
गाढवाचे झाले हाल

हिवाळा आला म्हणून
जाकीट घालून आला उंट
खोकला जाण्यासाठी
चघळू लागला सुंठ

हिवाळा आला म्हणून
हत्तीने घातला कोट
बटण गेले तुटून
उघडे राहिले पोट

हिवाळा आला म्हणून
शेकोटी केली वाघाने
डोळ्यात धुपट गेल्याने
घोडा किंचाळला रागाने

हिवाळा आला म्हणून
सिंह गुहेत दडे
लख्ख ऊन येण्यासाठी
सूर्याच्या पाया पडे



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ नोव्हेंबर २०२५


## माणसांच्या कल्याणासाठी

दिल्ली बॉम्बस्फोटाने हादरली
कैक निष्पापांचा हकनाक बळी
आम्हाला त्याचे काही देणेघेणे नाही
आमचे राजकारण करणे सुरू

देशात प्रश्ननच प्रश्न
त्यांच्याकडे सर्रास दुर्लक्ष
रोज जात,धर्म राजकारणाचा गजर
संविधानातील समतेचे काय ?

इथे नाही कुणाचाच विकास
माणसं अज्ञानी,अंधश्रद्धाळू केली जाताहेत
माणसांच्या विकासासाठी नसतो निधी
मात्र कुंभमेळ्यासाठी हजारो कोटी

जात, धर्माच्या नावानं
माणसं रोज मारली जाताहेत
सत्ताधारी टाळूवरचं लोणी खातात
त्यांना माणसांचे काय ?

आज तरी देशात सगळीकडे
विषमतेचा बाजार आहे
शैक्षणिक क्षेत्रे अन् कार्यालये
राजकीय हुकूमशाहीचे अड्डे होत आहेत

जे देशासाठी अन् संविधानासाठी लढतात
त्यांना देशद्रोही ठरवले जात आहे
जे जात,धर्मासाठी लढतात
ते मात्र देशभक्त ठरत आहेत

नको हा असला वैताग सारा
मनुष्य जन्म नाही पुन्हा
माणसांच्या कल्याणासाठी
सरकारने आता तरी कण्हावं




**प्रा. डॉ. सतीश मस्के**
पिंपळनेर (धुळे)
मो. 75075 04046


# जाती-पातीच्या पलीकडे माणूसपणाचा संदेश भागवत सांप्रदायाने दिला - अण्णा तोडकर



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** भागवत सांप्रदायानी जात,पात, धर्मांच्या पलीकडे जाऊन माणूसपण जपण्याचा विचार महाराष्ट्रालाच नाहीतर पूर्ण जगाला दिला.असे गौरव उद्गार काव्यप्रेमी महाराष्ट्र आयोजित अभंगवाणी राज्यव्यापी साहित्य संमेलनात उद्घाटन प्रसंगी मांडले. याप्रसंगी प्राचार्य वेंकट अणिगुंटे यांनी संप्रदाय हा माणसाला मुक्ती देण्याचा,शांततेचा आणि सौंदर्याचा विचार देतो.असेही या प्रसंगी त्यांनी विचार मांडले. अभंगवाणी राज्यव्यापी साहित्य संमेलनाचे आयोजन श्री क्षेत्र अचलबेट तुरोरी - कराळी तालुका उमरगा या ठिकाणी संपन्न झाले. या प्रसंगी विचारपीठावरती ह.भ.पं श्री हरी महाराज लवटे गुरुजी,ह.भ पं.भीम महाराज,अनाथ गरिबांची माय विद्याताई वाघ,प्राचार्य वेंकट अणिगुंठे,या महान विभूती उद्घाटक म्हणून विशेष उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला.आलेल्या पाहुण्यांच्या वरती पुष्पवृष्टी करून हरीणमाच्या गजरामध्ये अचलबेट देवस्थानच्या पवित्र ठिकाणी दिंडी काढून सुरुवात करण्यात आली. परमपूज्य काशिनाथ महाराज परमपूज्य उज्वलानंद महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून पुष्पवृष्टी करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मान्यवरांच्या स्वागतानंतर अभंगांनी कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून आलेले साहित्यिक, प्रवचनकार अभंगकार, प्राध्यापक, शिक्षक,वारकरी यांच्या अभंग वाणीतून जणू विठ्ठल अचलबेटी अवतरल्याचा भास झाला. हरिनामाच्या गजरामध्ये प्रत्येक अभंग नवा संप्रदायाचा सुगंधीत रंग तरंग निर्माण करत होता.एकूण महाराष्ट्रातल्या 66 कवींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सांगता आलेल्या प्रत्येक साहित्यिकांना ट्रॉफी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून उमरगा येथील मॉर्निंग वॉकचे सदस्य, काव्यप्रेमी महाराष्ट्राचे सदस्य, अभंगवाणी साहित्य संमेलनाचे पदाधिकारी संयोजक,विकास राठोड,लक्ष्मण पवार,सुनंदा भगत सुधाकर झिंगाडे,कमलाकर भोसले,विकास गायकवाड,राज जाधव के पी पवार, महाजन सर, दळगडे सर यांनी परिश्रम घेतले.माजी आयपीएस कमिशनर विठ्ठलराव जाधव यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीला शितल गहेवार,अस्मिता सुरवसे, स्वाती माने,अक्षय कामले,विजय टाकळे,आणि समाज विकास संस्थेमध्ये शिकत असलेले सर्व विद्यार्थी यांनी खूप परिश्रम घेतले. सोबत अचलबेट देवस्थानचे सर्व पदाधिकारी बाळ गोपाळ वारकरी या सर्वांच्या परिश्रमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलं होते.अभंगवाणी सोबत महाप्रसादाने सर्वजण तृप्त झाले. या कार्यक्रमाचे आयोजन समाज विकास संस्थेचे सेक्रेटरी,महाराष्ट्र लोकविकास मंचचे सचिव,उत्तर एनजीओ फाउंडेशनचे अध्यक्ष श्री भूमिपुत्र वाघ यांनी केले होते.. तर सूत्रसंचालन सन्माननीय भैरवनाथ कानडे यांनी केले....

## आयुष्याचे रान

फाटक्या वहीचे! फाटलेले पान!
आयुष्याचे रान! तापलेले!!

कुणब्याच्या भाळी! रोज अवकाळी!
रुसली दिवाळी! सदाचीच !!

अनमोल पिक! भाव मातीमोल!
पाताळात खोल! बळी माझा!!

कधी सुलतानी! कधी असमानी!
वाटा अडविती! जगण्याच्या!!

तरी ही इमान!मातीशी ठेवून!
बळीचं जगणं! ठरलेलं!!


ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो.९४०३३८४८८९





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ नोव्हेंबर २०२५

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात कायदेविषयक व सायबर सुरक्षा जनजागृती शिबीर संपन्न




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी कायदेविषयक आणि सायबर सुरक्षा विषयी जनजागृती शिबिर संपन्न झाले. कनिष्ठ विभागात संपन्न झालेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविद्यालयीन जीवनात अशा प्रकारची शिबिर होणे व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी गरजेचे असते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, स्थानिक गुन्हे शाखा यांच्यावतीने विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.यावेळी न्यायमूर्ती श्री. निलेश बंडगर सचिव, जिल्हा सेवा विधी प्राधिकरण जालना म्हणाले की, वर्तमान काळात विविध प्रकारच्या गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. कोण कधी कोणाला फसवतो हे कळेनासे झाले आहे. काळानुसार गुन्ह्याचे स्वरूपही बदलत चालले आहे. अशा पार्श्वभूमीवर आपण काळजी घेतली पाहिजे. स्त्रियांवरील अत्याचार वाढत चालला आहे. हुंडाबळी, घरगुती हिंसाचार, लैंगिक शोषण, आर्थिक शोषण, ऑनलाइन शोषण अशा विविध स्वरूपाच्या गुन्ह्यामुळे माणसा माणसातील विश्वास संपत चालला आहे. विद्यार्थ्यांनी उत्तम ज्ञान संपादन करून समाजाप्रती आपली जबाबदारी निभावली पाहिजे. यावेळी त्यांनी बाल गुन्हेगारीपासून इतर गुन्हेगारी पर्यंतची माहिती दिली. उत्तम प्रकारचे वर्तन करून जीवन जगले पाहिजे.स्थानिक गुन्हे शाखेचे श्री. संजय सोनवणे म्हणाले की, तंत्रज्ञानाचा आपल्या विकासासाठी आवश्यक उपयोग केला पाहिजे. ती काळाची गरज आहे. इंटरनेटमुळे सारे जग जवळ आले आहे. आपले सामाजिक- आर्थिक व्यवहारही सोपे झाले आहेत. मात्र योग्य ती काळजी न घेतल्यामुळे आपली त्यात फसवणूक होऊ शकते. अलीकडे सायबर क्राईमचे प्रमाण वाढत चालले आहे. सोशल मीडियाच्या मागे आपण प्रमाणापेक्षा अधिकच लागलो असल्यामुळे आपली फसवणूक होऊ शकते. म्हणून आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. अन्यथा आपली फसवणूक होऊ शकते. आपल्या गोपनीय माहितीची चोरी, ऑनलाइन छळ यासारख्या विविध प्रकारच्या कृतीमध्ये आपण गुंतलो जाऊ शकतो. अनोळखी माणूस आणि अनोळखी लिंक यापासून आपण नेहमी सावध राहिले पाहिजे. निनावी आणि संशयास्पद आलेल्या फोनला प्रतिसाद देऊ नये. आपली कोणत्याही स्वरूपाची वैयक्तिक माहिती सार्वजनिक करू नये. पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी म्हणाले की, स्त्रियांनी ज्ञानाच्या बळावर मोठमोठाली पदे भूषविली आहे. सर्वच क्षेत्रात त्या उच्च पदावर आहेत. आपल्यातील बलस्थाने ओळखून त्यानुसार प्रगती केली पाहिजे. स्वतःला कमजोर समजू नका. ही मानसिकता आपण बदलली पाहिजे. आपले मन आपण बळकट केले पाहिजे. आपल्या शारीरिक तंदुरुस्तीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे.प्राचार्य कविता प्राशर म्हणाल्या, समाजात काही विकृत मनोवृत्तीचे लोक असतात त्यांच्यापासून आपण सावध राहिले पाहिजे. प्रामाणिकपणे आपण अध्ययन करून आई-वडिलांचे नाव मोठे करावे. ज्ञान संपादन करण्याबरोबरच आपल्या आजूबाजूचे सामाजिक वातावरण कसे आहे याचेही ज्ञान संपादन करावे.या शिबिरात ज्यूडो कराटे प्रशिक्षक श्री. दत्ता पवार आणि ज्योती पवार यांनी विद्यार्थिनींना स्व-संरक्षण विषयक प्रशिक्षण दिले. सूत्रसंचालन सुधीर देशपांडे आणि आभार चंद्रकांत धोत्रे यांनी मानले. यावेळी बहूसंख्येने विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अखेर गल्ले बोरगाव - शिवना टाकळी रस्त्याच्या कामाला सुरुवात



**कन्नड (अरुण थोरात) :** तालुक्यातील गल्ले बोरगाव ते शिवना - टाकळी या खराब झालेल्या रस्त्याचे काम करण्यात यावे यासाठी या परिसरातील सामाजिक कार्यकर्ते रविंद्रबापू बोडखे यांनी धुळे - सोलापूर महामार्गावरील गल्ले बोरगाव चौफुली येथे बेमुदत उपोषण सुरु केले होते. नेहमीच्या वेळकाढू पणामुळे सुरुवातीला या उपोषणाकडे कुठल्याच नेत्याने किंवा कोणत्याही गाव पुढाऱ्याने लक्ष दिले नाही. मात्र जनसेवेचे आणि परिसर विकासास चालना मिळाली या निरपेक्ष भावनेने उपोषण सुरु करणारे रविंद्र बोडखे आपल्या उपोषणावर ठाम राहिले, आणि तालुक्याच्या आमदार संजनाताई जाधव यांनी आपल्या कामातून वेळात वेळ काढून या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याचे आश्वासन दिल्यानंतर रविंद्र बोडखे यांनी आपले उपोषण मागे घेतले. दुसऱ्या दिवशी कन्नड येथील बारामती ॲग्रो साखर कारखाना युनिट क्रमांक - 2 यांच्या कडुन या टाकळी बोरगाव रस्त्यावर डागडुजी करण्याचे कामास सुरुवात करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता असा प्रश्न या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांना सतावत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकाच्या गाड्या आणि प्रवास करणाऱ्यांच्या हाडे खिळखिळ्या झालेल्या आहेत. या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, किंवा तात्पुरती डागडुजी करण्यात यावी यासाठी परिसरातील नागरिकांनी, शेतकऱ्यांनी संबंधित विभागाच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवले, अनेकदा अर्ज, निवेदने देण्यात आली तरीही या रस्त्याची अवस्था सुधारण्यासाठी कुणीच पुढे येत नसल्याने परिसरातील सामाजिक कार्यकर्ते रविंद्र बोडखे यांनी उपोषणाचा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. आता या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील जनतेला हायसे वाटले आहे.या प्रसंगी उद्घाटन करताना रविंद्रबापु बोडखे व पंचक्रोशीतील सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे लोकप्रिय व्यक्तिमत्व, सर्वांचे लाडके विजय आबा हार्दे व कन्नड बारामती ॲग्रो साखर कारखान्याचे सहकारी अंकुशराव पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे.






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ नोव्हेंबर २०२५

# भुंड्या डोंगराचे दिवस : भुमियांचे आर्त स्वर मांडणारी कविता

**साहित्य** अकादमी युवा पुरस्कार प्राप्त कवी रवी कोरडे यांचा 'भुंड्या डोंगराचे दिवस'हा तुला प्रकाशनने प्रकाशित केलेला समकालीन ग्रामीण वास्तवाचे सृजनशील चिंतन आशय संपन्न चित्रण मांडणाऱ्या सिद्धहस्त कविता.गाव माणसाची हाक अर्पण पत्रिकेत "एसटी उभी राहिल या आशेने रस्त्यांच्या पाट्यापाट्यावर ताटकळत उभ्या असलेल्या बाया माणसासाठी..."हा आर्त स्वर या कवितेचा आहे..या कविता वाङ्मयीन नियतकालिकात व अनेक भाषेत अनुवादीत झालेल्या आहेत.बहात्तरच्या दुष्काळानंतर इतके संकरित झपाटलेपण मराठवाड्यातील भूमीला आले.या भूमियांची खंगाळून भूमिकाचं बदलली.ऊन वारा पाऊस या ऋतुचक्रात कुणबीक करणारा तो नव्याने उपसा जलसिंचनाच्या कचाट्यात अडकला.पुर्वी झाडाची तोड होतं नव्हती.झाड तोड सूरू झाली तशी डोंगर पोखरुन मुरुम,खडक दगड विक्री ही सुरू झाले.आणि मग गावगाड्यात भुंड्या डोंगराची अवदसा घुसली.तसे कुणबीक,माणसाचे दिवस सुरू झाले.शेती करण्याचे अवजारे गेले.औषध पाण्याची आणि रासायनिक खतांची शेती झाली.शेती माती महामुर पिकायला लागली.गावातं सडकं घुसली अन् गाव घसडू लागलं.कवी रवी कोरडे यांचे सृजन समपर्क चिंतन आशय म्हणजे ज्या गावात मी लहानपणी खेळलो,शिक्षण केलं.या गावंमातीचा श्वास कवीचा आत्मा होता.शाळा,घर,रस्ते पार,नदीओढे,नाले,डोंगर,झाडे,झुडपे,ज्या मायमातीत कवीचं अनवाणी पायधावलं,खेळलं कुदलं ही सविनय भावना अनावर ओढीने मांडली आहे.ही कविता पाच सृजन शृंखलेत विभागली आहे.'माणुसपणाच्या फांद्या शिवारभर'माणसातील माणुसकीचं गहिवरलेपण,शिवार मातीचा लळा जिव्हाळा आणि पाझलेपण कवीने आत्मिक ओथंबून सृजनशील स्नेहाळू भावनेचा ओलावा प्रतित केला आहे तो असो,"बैल पोळ्याच्या सणात/तू म्हणायचास त्या भारुडात/मलाही द्यायचास एक पात्र/ते म्हणताना/पुसून जायाच्या वयाच्या रेषा(पृष्ठ १३) ही गावातील विठूच्या वाटेची भूल एक सृजनशील निस्सीम भक्तीचा ओलावा देऊन जाते.जे मनाचं सोज्वळ जडणघडण या आपल्या माणसांने दिले.'तुझा रंग वावररासारखाच काळाभोर'ही गाव शिवारातली माणसं कष्टवंत होती.मातीशी एकरूप होऊन हिरव्या मनानं जगणारी माणसं.'तुच प्रतिबिंब आहेस सुखाचं' माय बाप,घर अंगण,गाय वासरू, नातवंडे पाहुन सुखावणारी आजी,हा जातिवंत स्पर्श जगण्याची उर्मी देणारा आहे.हे रक्तमासाचं नातं असं आहे "पोरं लपून बसली आहेत/दरवाज्यापाशी/तुला'भ्वा'करण्यासा ठी.आणि सहजा सहजी निखळू नये म्हणून/पक्या दोऱ्यात ओवते आहे/एक बाई काळी पोत/पाण्याचा थेंब ही न पिता "(पृष्ठ १७)साऱ्या शिवारभर माणूसपणाच्या फांद्या ही हळूवार मन व्यापून टाकते.सारचं नी सगळेचं गाव शिवार हे माणुसकीच्या फांद्यानी डवरले आहे.घरभर पसरलेली माणुसकीची माणसं,'सापडत नाही लोह तुझ्या शरीरात'ही अतिशय लक्षवेधी कविता,मातीत राबला, तरीही लोह नाही, कापूस महामुर घातला फेडरेशनवर,सुई दोऱ्याने फाटलेले दिवस शिवून काढले,गहू विकून, बाजरीच्या भाकरीवर दिवस काढले.भाजी पाला विकला,पण पाणीदार वरणात कुटके भिजून खाले,सायीदार दुध विकलं, इथं ताकाला फोडणी देऊन एकादशीचा उपास सोडला.ही सखेद वेदना या कवितेने दिली आहे.जसे"जे पिकलं तेही नाही उरलं तुझ्या रक्तामासात/गाय पानव्हल्यावर ओढून नेलेल्या वासरासारखे/तुझे डोळे/भिरभिरतात/हक्काचा पान्हा चोरल्या नंतर"(पृष्ठ १९)ही कवीची भावगर्भ सल उजागर होते.मातीशी नातं असणाऱ्यांच्या अंगात ही लोह नाही पण माणुसकीचे खळाणारे झरे आहेत.सुख दुःख वाटुन घेणारी एकमेकांच्या घरावर मायेची सावली धरणारे.मोठ्या निगुतीने संसार करणारी स्त्री, कशी सावली पेरत जाते.अंहकार दुर ठेवते, केवळ कष्ट करीत राहणे,भिंतीचे तडे बुजवणे,एक सृजनशील स्नेहाळू वेदना कवी लिहीतो,"तू हिरवे केलेस तुझ्या स्पर्शानं/माझे कफल्लक उन्हाळे"(पृष्ठ २१) गाव एक गारुड असते.ते आपल्या सृजनशील जगण्याला उभारी देते.त्यांची आठवण मनाला पंख उभारी देतात.एका अनामिक ओढीने मनाच्या कप्प्यात साठवून जातात अशीच"वारु आत्यासाठी" खरंच स्त्री जीवन किती भयंकर आहे.ती जगते जगविते, अनेक वेदना सहन करते इथला पुरुषी मनोवृत्ती तिच्या असाह्यतेचा फायदा घेतात तरी ही "तू परसवल्यास माणूसपणाच्या फांद्या शिवारभर"अन्सा कोल्हाटणीनंअनेक असह्यतेला आपल्या पदराची उब दिली.भावकीचंरघतपारखेपण ही या कवितेतून येते."भाऊबंदांनी तर केले होते दरवाजे बंद' 'बापाचा अंधार वाटून घेण्यासाठी'कवीशी नातं, अर्थ प्रवाहित, पळसफुलांचा जाळ,कवीची मायाळू शब्दाची नजर,पराभव पोटात घेऊन, पुस्तकांच्या पानावर हात फिरवतो,भूमीत जन्माला आलेली एक बाई,निरागस नात्याची चित्र काढणे,ही संवेदभावना माणूस होण्याची या कवितेतून दिसून येते.कवी शहरात राहतो,बाप मायाळू बटवा होऊन येतो पण सारं मन देहाने तो गाव शिवाराच्या कणाकणात पांगलेला असतो.जसे"पोराच्या पालखीला/तू बांधून दिलास एक दिवा/शहराची वाट दाखवणारा/आणि तू पांगलेला/गाव शिवाराच्या कणाकणात"(पृष्ठ ३५) भुंड्या डोंगराचे दिवस अनेक पिढ्यांनी ही होरपळ पाहिली आहे.जी साधन संपत्ती होती ती नावाला. झडीचे दिवसं,बारोमास खैराती पाऊस,फुटक्या पोहऱ्याचं पाणी काढून पाजणे.उनाड वासराला भुंड्या डोंगराचे दिवस, बाळमुठीत अंधार, दगडाला निष्पाप प्रदक्षिणा.या प्रतिमांच्या माध्यमातून एक प्रचंड वेदना मुखर होते ती की,रामकाठी बाभळीचा काटा आणि वारीत हरवलेला या युगाचा म्हातारा काळ त्या परतिच्या पावसा सारखा.एवढं भक्कास भयंकर शेतीमातीचे कष्टकऱ्यांचे हे भुंड्या डोंगराचे गाभडलेले दिवस.कुठेचं हिरव्या फांदीचे दिवस दिसतं नाही.काय झालं "गावाला दंश झाला विषारी राजमार्गाचा" सारं कसं रानं लहान लेकरागत होतं पण गावात 'पिवळाधमक जेसीबी उभा/अन् केलं कार्टकचेऱ्यात भावबहीणीना/झाडा वडांचे सावलीचे गावं,कांदा,ठेसा, बाजऱ्याच्या भाकरी चवीनं खानारं गावं एकदम दंगलीत भोसूकून काढवं तसं कापून काढलं झाडं.हिरव्या गच्च पानाचं गावं भुंड होतं.अशा प्रतिमांच्या माध्यमातून मन पिळवटून टाकणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल अनुबंध बांधते.या गाव शिवाराला एखाद्या अजगरी विळख्याने बेशुद्ध झिंजाडून टाकावं असा विळखा म्हणजे गावाच्या गावखुरी टॉवर उभा केला.गावाचा प्राण वायू हिसकून घेतला.गावाचा विकास ही सहानुभूतीचे तोरणं,या निमित्ताने हरबरा खुडून भाजी,वांगे, गाजरं शेरन्या,बोरा जांभळाचे भाव,बेलाची पाने,रुईच्या माळा विकून पैसे केले.गावशेतकऱ्याचे खिसे खालीच राहिले.त्यांनी बटाटे, टमाटे बेभाव घेऊन त्याचे वेफर्स जॅम सॉस करून विकले.हे शेतकऱ्यांचं भुंडपण या कवितेचा आत्मा घेऊन येतं.पुढे'या वर्तमानाच्या दहशतीत'आजही गावं खेड्यातील सर्वहरा सामान्य त्रयस्थ स्त्री.बाळंत होते कामावरून परत येताना झुडपाच्या आडोशाला,हे कडू कारल्याचे दिवस, हे भंयकराचे दिवस आणखी संपले नाहीत..ही वर्तमानाची दहशत कायमची नष्ट झाली पाहिजे हा अदम्य् विश्वास या कवितेमधून आला आहे.आज खळेदळे वैभव संपन्नतेचे मळे भन्नाट दिसताहेत पण ती ओंजळभर सुखाची तृप्तीदिसतं नाही.गाव यात्रा ह्या खळ्या भोवती फिरणाऱ्या होत्या.ते सुगीचे दिवस नाही राहिले,नव्या युगाची बेईमानी.वावर नावावर करून घेण्यासाठी तिला नवं लुगडं नेसून आनलं.सरकारी कचेरीत."जांभळा अंगठा ठेकून/शेवटचाफेरफार करण्यासाठी/सातबाऱ्यावर"(पृष्ठ ५०)धुसरं झालेल्या बुबुळात हे सारं भरल्या डोळ्यांने पाहावं लागतं आहे.'तुझ्या वारसाना नकोय तुझ्या कुणबीकीची कहाणी'फक्त मालकी हक्क मागणारी, जमीन जुमल्याचा.बाप म्हणून तुझ्याच सागवानी लाकडाचा झोपाळा करून देतो, शहरात.साखळ्या तेवढ्या पोराच्या..ही सखेद भेदक वास्तव आजचे आहे.'ओल्या ढगांचे भास'केवळ कॅलेंडरवरचं नक्षत्रांचे देणं होऊन बसले आहेत.'धुळफेक' युगानुयुगे चालू आहे.तरी शेतकऱ्यांचो निष्ठा काळ्यामातीशी आहे.इथे बेइमानी करून फसवणूक करणारे भामटे मोठेपणा मिरवत आहेत.तसा त्याचा 'देवभोळे पणा अदम्यच."श्रावणातल्या पोथ्यांचा/सावकारी पोथ्याशी असलेला सहसंबंध/तू घाबरतोस/अंधारात वेटोळ्या होऊन पडलेल्या/दोरीला साप समजून"(पृष्ठ ५५) आज डफाळलेल्या तुरीच्या पाट्यातूनजाताना मनभरू येतं पण "कुलवंत जखमांचे ठसे"घेऊन मिरवणारे एक निखळ पाटा तुरीचा असायचा.झाडावर तुरीच्या शेंगा वाळायच्या चुकून एखादा दाना उगवून आलातर,"टराटुन आला मिरगानंतर/तर त्याला उपटून फेकल्या गेलं/आडतासात उगवण्याची/चुक केली म्हणून (पृष्ठ ६०) "भुंड्या डोंगराचे दिवस"ची पाठराखण साहित्य अकादमी पुरस्कार विजेते ख्यातनाम लेखक डॉ आसाराम लोमटे लिहितात "ही केवळ भुंड्या डोंगराच्या दिवसाची कविता नाही तर कोणत्याचं सातबाऱ्यावर नोंद नसणाऱ्या, बिन चेहऱ्याच्या आणि गावातून हुसकवलेल्या माणसाची कविता आहे.जिथे हिरव्या गार पानांचं डौलदार गावं उठवलं जातं, रक्ताच्या नात्यातले भाऊबंदही दारं बंद करतात, आयुष्यातले अंकुरण्याचे दिवसही पाणगळीचे होतात.तथाकथित विकासाच्या नावाखाली कित्येक पायवाट दबून जातात आणि जिथे पावसाचे नक्षत्र फक्त कॅलेंडरवरच दिसतात.पंढरीची वाट आणि शब्दांचं सर्जनशक्यतांवर या कवितेचा भरोसा आहे.या कवितेला करुणेचे आशयघन सुत्र आहे.म्हणून ही कविता जगण्याचा बळकट दोर घट्टपणे धरून ठेवण्यात यशस्वी झाली आहे "ही अतिशय लक्षवेधी विचार चिंतनाची पाठराखण आहे.कवीवर्य वीरधवल परब यांनी"मानवी नातेसंबंधातील अंतर्गत गुंतागुंतीचा तळठाव घेणाऱ्या अनेक कविता या संग्रहाचे मौलिक अधिष्ठान आहे "मुखपृष्ठ मैत्रेय पाठक,पुणे रचना व रेखटने दिलीप चव्हाण,पुणे यांचे आहे तुला प्रकाशक - कवीवर्य श्रीधर नांदेडकर यांनी अतिशय देखणा कवितासंग्रह केला आहे.कवी स्नेही रवी कोरडे यांचे मनस्वी अभिनंदन.



**भुंड्या डोंगरांचे दिवस:-**
**कवी रवी कोरडे**
तुला प्रकाशन:-छत्रपती संभाजी नगर.
प्रकाशक:-श्रीधर नांदेडकर, संभाजी नगर.
मुखपृष्ठ:-मैत्रेय पाठक, पुणे
प्रथम आवृत्ती:-२४डिसेंबर २०२४
किंमत:-२५०रूपये
पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना
संवाद:-९९७५१३७३३७

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ नोव्हेंबर २०२५

# गुरु तेग बहादूर : मानवतेचे रक्षक

**भा**रतीय संस्कृतीचा आणि मानवतेच्या इतिहासाचा अभ्यास करताना काही व्यक्तिमत्त्वे अशी भेटतात की ज्यांचे जीवन, विचार, आणि बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे शीख धर्माचे नववे गुरु 'गुरु तेग बहादूर' होते. २४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारत देश त्यांच्या बलिदानाची, त्यांच्या मूल्यांची आणि त्यांच्या अद्वितीय मानवतावादी विचारांची स्मृती जागवतो. हा दिवस केवळ एका धार्मिक गुरूच्या हौतात्म्याचा दिवस नाही, तर मानवी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मगौरवासाठी प्राणार्पण करणाऱ्या महापुरुषाचा वैश्विक स्मरणदिन आहे.गुरु तेग बहादूर यांचे संपूर्ण जीवन हे सामाजिक बांधिलकी, समता, दीनदुबळ्यांचे रक्षण, शांतता, अध्यात्म आणि संघर्षातील धैर्याचे प्रतीक आहे. इतिहासात अनेक योद्धे लढले, अनेक सम्राटांनी सत्ता मिळवली, अनेक विद्वानांनी ज्ञान दिले, परंतु एखाद्याच्या धर्म, संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी स्वतःचा जीवदान देणारी व्यक्ती विरळच आढळते. गुरु तेग बहादूर यांचे बलिदान हा जगाच्या इतिहासात अभूतपूर्व प्रसंग आहे.गुरु तेग बहादूर यांच्या काळातील भारत देश हा राजकीय संघर्ष, धार्मिक अंधश्रद्धा, जातिभेद, आणि अत्याचाराच्या छायांनी वेढलेले होता. मुगल सत्तेचा प्रभाव वाढत होता, आणि औरंगजेब धर्मांतराच्या धोरणातून इस्लामीकरणाचा प्रसार करू इच्छित होता. हिंदू, जैन, सूफी, बौद्ध आणि अनेक समुदायांवर धर्मांतराचा दबाव वाढत होता. काश्मीरच्या विद्वान पंडितांनी आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी दिल्ली नव्हे, तर पंजाब गाठले आणि तेथे त्यांनी आशेचा किरण म्हणजे गुरु तेग बहादूर यांना भेटले. त्यांच्या वेदनादायी कथा ऐकून गुरुजींनी जो निर्णय घेतला, तो इतिहासातील सर्वात मोठा न्याय, स्वातंत्र्य आणि मानवतेचे रक्षण करणारा निर्णय ठरला.गुरु तेग बहादूर यांनी समतेवर आधारित समाज बांधण्यासाठी श्रद्धेची शक्ती, क्षमेचे दर्शन आणि न्यायाची भावना जोपासली. त्यांच्या शिकवणींमध्ये "भीतीवर मात" हे केंद्रस्थानी होते. स्वतःच्या ग्रंथांत त्यांनी लिहिले आहे की "जो डरता नाही, जो दुसऱ्याला घाबरवत नाही, तोच खरा ज्ञानी आणि मुक्त आहे." त्यांचा संदेश स्पष्ट होता की "मनुष्याने मुक्त जगावे. त्याची श्रद्धा, अस्तित्व आणि स्वाभिमानावर कुणाचाही अंमल चालू नये." त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू समाजाचा सर्वांगीण विकास हा होता. अनेक स्थळी त्यांनी गुरुद्वारे स्थापन करून 'लंगर' या परंपरेला अधिक बळ दिले. लंगर ही केवळ भूक भागविण्याची पद्धत नव्हती, तर समता, बंधुता आणि जातिनिरपेक्ष सामाजिक एकतेचा प्रयोग होता. त्या काळातील जातिव्यवस्थेच्या कठोरतेला धक्का देणारी ही सामाजिक क्रांतीच होती. एका थाळीत श्रीमंत-गरीब, हिंदू-मुस्लिम, ब्राह्मण-शूद्र, राजा-प्रजा सगळ्यांनी बसून भोजन करणे हा एक मौन सामाजिक संदेश होता. या संदेशामधून "मानवात भेद नाही." हे स्पष्ट होत होते.गुरु तेग बहादूर यांची समाजकार्याची दृष्टी केवळ धार्मिक मर्यादांपुरती नव्हती. त्यांनी अनेक गावांत विहिरी, तलाव, रस्ते, विश्रामगृहे आणि आश्रयधामे बांधली. त्यांच्या शिकवणीत मानवी समतोल, मानसिक शांती आणि सामाजिक जबाबदारी या तीन स्तंभांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी लोकांना ध्यान, संयम आणि निष्ठेने जीवन जगण्याची प्रेरणा दिली.त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अध्यात्मिक नव्हते; ते एक शूर योद्धेही होते. त्यांच्या बालपणातच 'गुरु हरगोबिंद साहिब' यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शौर्य, अस्त्र-शस्त्र प्रशिक्षण आणि राष्ट्रसेवेचे धडे घेतले. त्यामुळेच, जेव्हा स्वातंत्र्यावर गदा येत होती, तेव्हा त्यांनी मौन साधना नाही केली, तर थेट अन्यायाच्या विरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतला. आणि मग आला इतिहासातील अंधाऱ्या अत्याचारांचा क्षण. जेव्हा काश्मीरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी स्वतःचा जीव अर्पण करण्याचे ठरवले. त्यांनी औरंगजेबाला स्पष्ट संदेश दिला होता की, "जर मी धर्मांतर केले तर लाखो हिंदू धर्मांतर करतील, आणि जर मी प्राण दिले तर भविष्यात कोणीही धर्मावर अत्याचार करण्याचे धाडस करणार नाही."दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या कारागृहात त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले, पण त्यांनी धर्म, न्याय आणि स्वातंत्र्य यांची बाजू सोडली नाही. २४ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. आज त्या ठिकाणी उभे असलेले 'गुरुद्वारा शीश गंज साहिब' हे केवळ धार्मिक स्थळ नाही तर ते 'मानवी हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे स्मारक आहे. त्यांच्या बलिदानाचा प्रभाव भारतीय समाजात आणि जगभरातील मानवतावादी विचारांतून दिसून येतो. भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराचा बीजकण गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानातूनच उगवलेला दिसतो. ते जगाला शिकवून गेले की "स्वत:साठी जगणारा सामान्य असतो, परंतु दुसऱ्याच्या स्वाभिमानासाठी प्राण देणारा अमर असतो."आजच्या काळात गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला काही महत्त्वपूर्ण मूल्ये सांगते, ते म्हणजे समाजाला समता हवी, भीती नव्हे; संवाद हवा, संघर्ष नव्हे; मानवता हवी, हिंसा नव्हे; मन मुक्त हवे, शरीर नाही. धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली अजूनही जगात हिंसा घडते. जात, धर्म, वंश, भाषा यावरून अजूनही संघर्ष होतात. अशा काळात गुरु तेग बहादूर यांचे बलिदान आपल्याला आठवण करून देते की 'मानवता सर्वात श्रेष्ठ धर्म आहे.' त्यांचे बलिदान हा केवळ इतिहासातील प्रसंग नाही तर तो न्याय, स्वातंत्र्य, विविधता आणि मानवतेच्या स्वीकाराचा एक जिवंत संदेश आहे.आज, त्यांच्या शहीद दिनानिमित्त भारतासह जगभरातील समाज एक प्रश्न विचारतो की "आपण मानवतेचे रक्षण करण्यासाठी कितपत तयार आहोत?" गुरु तेग बहादूर आपल्याला शिकवतात की समाजातील दुर्बल, शोषित, पीडित वर्गासाठी आवाज उठवणे ही केवळ जबाबदारी नाही तर ते एक मानवी कर्तव्य आहे. त्यांच्या जीवनाने दाखवून दिले की "धर्म म्हणजे इतरांचा धर्म नष्ट करणे नव्हे, तर प्रत्येकाच्या श्रद्धेचा सन्मान करणे होय." त्यांचे स्मरण केवळ धार्मिक नाही तर ते राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी वारसा आहे. आजचा दिवस हा केवळ त्यांच्या शहादतीचा स्मरणदिन नाही, तर त्यांच्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा दिवस आहे.गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे जळणारे दीप आहे 'जे अंधारातही प्रकाश देते, भीतीतही आत्मविश्वास देते, आणि संघर्षातही सत्य न सोडण्याची प्रेरणा देते. या महान विभूतीला विनम्र अभिवादन.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. ९९६०१०३५८२

bagate.rajendra5@gmail.com

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.